**१८ व्या पिफ अंतर्गत आज रविवार दि. १२ जानेवारी रोजी झालेल्या पत्रकार परिषदांमधील महत्त्वाचे मुद्दे –**

पुणे फिल्म फाउंडेशन आणि महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त विद्यमाने सुरु असलेल्या १८ व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात आज रविवार दि. १२ जानेवारी, २०२० दरम्यान झालेल्या पत्रकार परिषदांमधील महत्त्वाचे मुद्दे खाली देत आहोत. आज महोत्सवाचे कलात्मक दिग्दर्शक समर नखाते यांनी पत्रकार परिषदेसाठी उपस्थित दिग्दर्शक व निर्माते यांच्याशी संवाद साधला.

**<u>चित्रपट – विडो ऑफ सायलेन्स</u>**

उपस्थिती– प्रवीण मोर्छले (दिग्दर्शक, निर्माते)

पती बेपत्ता झालेल्या पत्नीची अवस्था ही एकाकी होऊन जाते. तिचे संपूर्ण आयुष्यच बदलून जाते. काश्मीर आणि ज्या भागात अस्थिरता आहे त्या प्रदेशात तर हे प्रकर्षाने जाणवते, अशीच काश्मीर मध्ये घडणारी कथा 'विडो ऑफ सायलेन्स' चे दिग्दर्शक व निर्माते प्रवीण मोर्छले यांनी चित्रपटात मांडली आहे. या आधी दिग्दर्शकाला तीन राष्ट्रीय पुरस्कार मिळाले असून याही चित्रपटात त्यांनी आपले वेगळेपण सिद्ध केले आहे.

– काश्मीरमधील परिस्थितीबद्दल अनेकदा वर्तमानपत्रे व बातम्यांबद्दल वाचत होतो. एका सकाळी असेच बातम्या वाचत असताना 'हाफ विडो' हा विषय समोर आला. आणि त्या महिलांची कथा आपण मांडायची असे ठरविले. या परिस्थितीमधून गेलेल्या एका महिलेला मी प्रत्यक्षात भेटलो. 'कोणीही आम्हाला जिवंत समजत नाही', या त्यांच्या एका वाक्याने मी हादरून गेलो आणि या विषयाची खोली माझ्या लक्षात आली असे प्रवीण मोर्छले यांनी सांगितले.

– जेव्हा एखादा पुरुष त्याच्या स्थानिक परिस्थितीला कंटाळून दुस–या ठिकाणी जातो, त्यावेळी तो नव्या ठिकाणी लवकर रुळतो. मात्र ही गोष्ट महिलांच्या बाबतीत होत नाही. मुळात शिक्षणाची वाणवा, कमी आत्मविश्वास, अवलंबून राहण्याची सवय यामध्ये त्या अडकलेल्या असतात. त्यामुळे त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. यातून त्यांची होणारी कुचंबना, त्यांना येणा–या समस्या व त्यांची बाजू मांडण्याचा प्रयत्न आम्ही चित्रपटामध्ये केला आहे.

– या चित्रपटातील नायिका ही दिसायला सुंदर तर हवी होतीच याशिवाय तिचे डोळेही बोलके हवे होते.

त्यासाठी आम्ही खूप शोध घेतला न शेवटी शिल्पी मारवाह यांची यासाठी निवड केली.

- संपूर्ण चित्रपटात आम्ही पार्श्वसंगीताचा वापार टाळत त्या त्या भागातील नैसर्गिक आवाजाचा उपयोग करून घेतला. याबरोबरच नैसर्गिक प्रकाशावर हा संपूर्ण चित्रपट आम्ही चित्रित केला आहे, असे मोर्छले यांनी सांगितले.




**<u>२. चित्रपट - अ नाईट अ डे</u>**

उपस्थिती- प्रताप जोसेफ (दिग्दर्शक)

'अ नाईट अ डे' या चित्रपटाची कथा केरळमध्ये घडते. दोन प्रेमी आपले घर सोडून पळून येतात आणि पुरामध्ये उध्वस्त झालेल्या एका घरात आसरा घेतात. त्यानंतर घडणारा दिवस आणि रात्रीचा, माहित असलेल्या- माहित नसलेल्या गोष्टींचा प्रवास या चित्रपटात दिग्दर्शकाने चित्रित केला आहे. केरळ मधील दुष्काळ, पूर आणि ऑनर किलिंग यांना एकत्र बांधण्याचा एक प्रयत्न यामध्ये आपल्याला दिसेल.

- केरळ सारख्या राज्यातील सामाजिक विषयावर प्रकाश टाकण्याच्या उद्देशाने या चित्रपटाची निर्मिती केली आहे. चित्रपटासाठी नायक नायिका म्हणून नवे चेहरे हवे होते जेणेकरून विषय प्रभावीपणे पोहोचेल, हे करण्यात यश मिळाले. केवळ पाच दिवसात चित्रीकरण करून कमीत कमी बजेट मध्ये हा चित्रपट तयार

केला.  मला सामाजिक प्रश्न मांडताना शारीरिक हिंसा टाळायची होती ते करण्यात मी यशस्वी झालो, असे प्रताप जोसेफ यांनी सांगितले.




## ३.  चित्रपट  -  निर्वाणा इन

उपस्थिती  -  विजय जयपाल (दिग्दर्शक)

- आत्महत्या करण्याचे थ्रील असलेल्या एका बोट ड्रायव्हरची कथा ‘निर्वाणा इन’ या चित्रपटात सांगितली आहे.  बोटीवरील सर्व प्रवासी मृत्यूमुखी पडतात पण आत्महत्येचे थ्रील करणारा तो बोट ड्रायव्हर आश्चर्यकारक रित्या त्या अपघातातून वाचतो.  नंतर एका हॉटेल मध्ये केअरटेकर म्हणून काम करत असताना त्याच्या पूर्वाआयुष्यातील गोष्टी कसा त्याचा पाठलाग करतात याची कथा चित्रपटात सांगितली आहे.

- मला एक जॉनर फिल्म करायची होती तो प्रयत्न ‘निर्वाणा इन’ या चित्रपटामधून मी केला आहे. सुरुवातील तमिळ किंवा मल्याळम भाषेतील हा चित्रपट नंतर आदिल हुसैन अभिनय करणार म्हणून हिंदी भाषेत करावा लागला.  सायकॉलॉजिकल हॉरर चित्रपट आणि आदिलाचा अभिनय असे सर्व काही यामध्ये जुळून आले असल्याचे विजय जयपाल यांनी सांगितले.  आदिल असल्यामुळे रिहर्सल्सला आम्हाला वेळ मिळाला नाही.  कॅमेरा प्लॉटिंग आणि एडीटिंगसाठी आम्हाला बराच वेळ द्यावा लागला,  असेही त्यांनी यावेळी सांगितले.




**For any media related queries, please contact - Hundred Percent Public Relations**

Sneha - 9552583473 / Sampada - 9405035376 / Dhanshree- 9850890600

Hundred Percent Public Relations
PIFF Media Team